**FORM B**

PUBLIC ANNOUNCEMENT

(Regulation 12 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016)

FOR THE ATTENTION OF THE STAKEHOLDERS OF PURVI METALS PVT. LTD.

| Sl. No. | PARTICULARS | DETAILS |
|---|---|---|
| 1. | Name of corporate debtor | M/s Purvi Metals Pvt. Ltd. |
| 2. | Date of incorporation of corporate debtor | 18th October 2011 |
| 3. | Authority under which corporate debtor is incorporated / registered | RoC - Mumbai |
| 4. | Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor | U51109MH2011PTC223185 |
| 5. | Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor | PLOT NO 95/96/129 JAWAHAR CO OP IND ESTATE KAMOTHE PANVEL DIST RAIGAD MUMBAI MH 410219 IN |
| 6. | Date of closure of Insolvency Resolution Process | 23/02/2024 |
| 7. | Liquidation commencement date of corporate debtor | 04/03/2024 |
| 8. | Name and registration number of the insolvency professional acting as liquidator | Bharati Manoj Daga IBBI/IPA-001/IP-P-01963/2020-2021/13070 |
| 9. | Address and e-mail of the liquidator, as registered with the Board | 94B, PALASH TOWER, VEERA DESAI ROAD, ANDHERI WEST, MUMBAI 400053, NEAR COUNTRY CLUB, Mumbai Suburban, Maharashtra ,400053 bharteedaga1008@gmail.com |
| 10. | Address and e-mail to be used for correspondence with the liquidator | 301, Poonam Pearls, Opp.to New India Assurance Colony, Juhu Lane, Andheri (W) – 400058 liquidation.purvimetals@gmail.com |
| 11. | Last date for submission of claims | 24/03/2024 |

Notice is hereby given that the National Company Law Tribunal (*Mumbai Bench*) has ordered the commencement of liquidation of the Purvi Metals Pvt. Ltd. on 23/02/2024.

The stakeholders of Purvi Metals Pvt. Ltd. are hereby called upon to submit their claims with proof on or before 24/03/2024, to the liquidator at the address mentioned against item No.10.

The financial creditors shall submit their claims with proof by electronic means only. All other creditors may submit the claims with the proof in person, by post or by electronic means.
Submission of false or misleading proof of claims shall attract penalties.

SD/-

Date: 06/03/2024

Bharati Manoj Daga

**Place: Mumbai**

**Liquidator of Purvi Metals Pvt. Ltd.**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।



# किनारा तुला सिडकोला

चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती।
कथा या खुळ्या सागराला अनंत आमुची ध्येयासक्ती।
अनंत अन आशा किनारा तुला पामराला।

कवी कुसुमाग्रजांचे हे काव्य ज्यामधून ध्येयासक्ती आणि अनंत अशा आत्मविश्वासाचे वर्णन केले गेले. ज्याचे मोजमाप करता येत नाही. ज्यांची ध्येयासक्ती अमर्याद आहे. त्यांना किनाऱ्याचीही आवश्यकता भासत नाही. या कवितेचा हा आशय जर लक्षात घेतला तर महाराष्ट्राला लाभलेल्या सातशे वीस किलोमीटरच्या किनारपट्टीलाही असाच अनंत आत्मविश्वास आणि ध्यास लाभलेला आहे. आता याच किनारपट्टीचा विकास करण्याची आस राज्य सरकारला लागलेली दिसते. हा संपूर्ण सातशे वीस किलोमीटरचा किनारपट्टीचा भाग विविध प्रकारच्या विकासाकरिता सिडको म्हणजेच शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ ज्याच्याकडे शहरांच्या नियोजनबद्ध विकासाची जबाबदारी सोपवली जाते. सर्वप्रथम नवी मुंबईच्या विकासासाठी सिडकोची स्थापना केली गेली. आणि अपेक्षेप्रमाणे नव्या मुंबईचा आधुनिक पद्धतीने आणि अधिकाधिक नियोजनबद्ध विकास केला गेला. म्हणजे सिडकोच्या स्थापनेमागे जो उद्देश होता तो सफल झाल्याने सिडकोकडे इतर शहरांच्या लगत नवीन शहरे वसवण्यासाठीदेखील जबाबदारी सोपवली गेली. ज्यामध्ये नवीन नाशिक, नवीन संभाजीनगर अशा काही शहरांचा समावेश होता. सिडकोने तयार केलेल्या नागरी आणि औद्योगिक वसाहती अनेक अर्थांनी यशस्वी ठरल्या. कदाचित हाच अनुभव लक्षात घेऊन आता संपूर्ण कोकण किनारपट्टीवरच्या नियोजनबद्ध विकासाची जबाबदारी सिडकोकडे देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला दिसतो. परंतु हा निर्णय घेण्यापूर्वी प्राथमिक स्वरूपात या किनारपट्टीचा कोणकोणत्या माध्यमातून विकास होऊ शकतो. याचा आराखडा जाहीर करणे आवश्यक होते. जसा कोणताही प्रयत्न न करता सिडकोकडे ही जबाबदारी दिली गेली आहे. परंतु संपूर्ण किनारपट्टीमध्ये विपुल अशी नैसर्गिक साधनसंपत्ती शिवाय पर्यटनाची देणगी लाभलेली आहे. या भागाचा ज्या ज्या पद्धतीने विकास होईल तो तो कमीच पडावा अशी आज तिथली परिस्थिती आहे. म्हणूनच सिडकोचीच कसोटी लागू शकते आणि किनारा तुला सिडकोला असे त्याचे स्वरूपही समोर येते.

**कोकणाची ओळख कायम राहावी**

राज्य सरकारने हा निर्णय आताच का घेतला हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. महिनाभरावर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुका आणि वर्षभराने होणाऱ्या विधानसभा निवडणुकांचा विचार केला तर त्यातला राजकीय अर्थदेखील स्पष्ट होतो. परंतु आपल्याकडे लोकशाही व्यवस्था आहे. राज्यकारभार हा निवडणुकांचे राजकारण समोर ठेवून चालवला जातो. त्यानिमित्ताने का होईना परंतु विकासाचे धोरण राबवले जाणार असेल तर त्याचा स्वीकार करावा लागेल. कोकणबाबत घेतला गेलेला हा निर्णय तिथल्या विकासाला पूरक ठरू शकतो. परंतु आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेतला तर विकासाच्या या वरवंट्याखाली त्या त्या भागातल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचाही बळी दिला जातो. कोकणाचे वैशिष्ट्य अनेक अर्थाने खूप मोलाचे ठरते. मुळातच महाराष्ट्रासारख्या राज्याला इतका विस्तीर्ण सागरकिनारा लाभलेला आहे. शिवाय कोकणची संपूर्ण भूमी ही आंबा, काजू, फणस, सुपारी, नारळ अशा फळबागांसाठी प्रसिद्ध तर आहेच. शिवाय या परिसरात मत्स्य व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो. छोट्या छोट्या खाड्या किंवा ज्याला आपण छोटे समुद्र किनारे म्हणू शकतो अशा ठिकाणी अत्यंत सुंदर पर्यटनाची ठिकाणेदेखील आहेत. अशा एक ना अनेक मुद्यांचा विचार केला तर तिथल्या या निसर्गाला जपण्याचा कसा आणि कोणता प्रयत्न होणार आहे हेदेखील सरकारने स्पष्ट केले पाहिजे. काही वर्षांपूर्वी एन्रॉन प्रकल्प आणला गेला. भ्रष्टाचार आणि राजकारणामुळे त्याला गाशा गुंडाळावा लागला. आतादेखील जैतापूरचा अणूवीज प्रकल्प आणि नाणारच्या तेलवायू प्रकल्पाच्यानिमित्ताने बरीच मोठी आंदोलनेही झाली. म्हणूनच प्रकल्पांचा रेटा आणि तिथल्या निसर्गावर वरवंटा असे समीकरण होता कामा नये. निसर्गतः कोकणाला लाभलेली ही ओळख आहे ती केवळ टिकवण्याचेच नव्हे तर त्यात आधुनिकता आणून तिचाही विकास करण्याचे काम सिडकोने केले पाहिजे आणि हे तितकेच मोठे आव्हान सिडकोपुढे राहणार आहे.

**आंतरराष्ट्रीय ब्रँडींग आवश्यक**

संपूर्ण किनारपट्टीच्या विकासाची जबाबदारी सिडकोवर सोपवणे म्हणजेच एकूणच नगरनियोजनातला तोदेखील मोठा विक्रम ठरू शकेल. रायगड, पालघर, विरार, या भागातही नगरनियोजनाचे काम काही प्रमाणात सिडकोकडे दिले गेले होते. परंतु हा सर्वात मोठा भूभाग सिडकोला विकसित करायचा तर आहेच. परंतु तितकाच मोठा किनारपट्टीचा भाग विकसित करण्याचे आव्हानही पेलायचे आहे. यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या संस्थेची सल्लागार म्हणूनही नियुक्ती केली जाणार आहे. परंतु या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या संस्थेला कोकणाचे वैशिष्ट्य सांगणे आणि तिथली शेती, पर्यटन, लोकजीवन, कोकणाला लाभलेला ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक वारसा या सगळ्यांचे महत्त्व समजावून द्यावे लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या विकासातून कोकणात रोजगार निर्माण झाला पाहिजे. रोजगार निर्माण होण्याबरोबरच तंत्रज्ञानाला अनुकूल पायाभूत सुविधाही आवश्यक ठरतील. ज्यामध्ये वेगवेगळ्या शिक्षण संस्था, रुग्णालये, याचा विचार अग्रक्रमाने करावा लागेल. सागरी किनारा लक्षात घेऊन सुरक्षितता आणि संरक्षण दुर्लक्षित करून चालणार नाही. अर्थातच कोणत्याही पद्धतीने कोकणाची जी ओळख आहे ती पुसली जाणार नाही. उलट कोकणाचे निसर्ग आणि वैभवाचे जागतिक स्तरावर ब्रँडींग करण्याचा प्रयत्न सिडकोकडून व्हायला हवा. ज्याप्रमाणे आज गोवा किंवा केरळच्या किनारपट्टीचे जागतिक स्तरावर ब्रँडींग झालेले आहे. यापुढच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करताना स्थानिक नागरिकांना किंवा संस्थांना विश्वासात घेणे तितकेच आवश्यक ठरते. सध्या ज्याठिकाणी स्वायत्त संस्थांचा कारभार चालतो. त्यांना सिडकोच्या कार्यक्षेत्रातून वगळले गेले आहे. बऱ्याच कालावधीनंतर शहरी नियोजनाची व्यवस्था होत असेल तर ती विचारपूर्वक झाली पाहिजे.

# मध्य प्रदेशचा पराभव करून विदर्भ फायनलमध्ये रणजी चषकाच्या अंतिम फेरीत मुंबईचे पारडे जड



■ मुंबई

मध्य प्रदेशने पहिल्या डावात विदर्भावर ८२ धावांची आघाडी घेतली. तर विदर्भाने दुसऱ्या डावात यश राठोडच्या १४१ धावांच्या जोरावर ४०२ पर्यंत मजल मारली. त्यामुळे मध्य प्रदेशला विजयासाठी ३२० धावांचे आव्हान मिळाले. मध्य प्रदेशच्या ओपनरने ९४ धावांची तडाखेदार खेळी केली तर हर्ष गवळी याने ६७ धावा जोडून मध्य प्रदेशच्या विजयाच्या आशा कायम ठेवल्या. मात्र हे दोघेही आऊट झाल्यानंतर मध्य प्रदेशच्या इतर फलंदाजांना काही खास करता आले नाही. मध्य प्रदेशचा डाव २५८ धावांवर आटोपला.

विदर्भाचे पहिल्या डावात १७० धावांवर पॅकअप झाले. मात्र त्यानंतर दुसऱ्या डावात यश राठोडच्या १४१ धावांच्या खेळीमुळे विदर्भाने जोरदार मुसंडी मारत कमबॅक केले. अक्षय वाडकर यानेही ७७ धावांची खेळी केली. त्यानंतर विदर्भाच्या गोलंदाजांनी मध्य प्रदेशला २५८ धावांत गुंडाळून फायनलचे तिकीट कन्फर्म केले. आता मुंबई विरुद्ध विदर्भ यांच्यात १० मार्चपासून मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये अंतिम सामना खेळवण्यात येणार आहे. रणजी चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात एकाच राज्यातील २ संघ फायनलमध्ये पोहोचण्याची ही दुसरी वेळ ठरली आहे. याआधी १९७१ साली मुंबई विरुद्ध महाराष्ट्र असा सामना झाला होता. तेव्हा मुंबईने बाजी मारली होती. आता ५३ वर्षांनी पुन्हा एकदा एकाच राज्यातील संघ आमनेसामने आहेत. दरम्यान कागदावर मुंबईचा संघ विदर्भापेक्षा मजबूत आहे. मुंबई संघात अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर, पृथ्वी शॉ, सर्फराज खान यांच्यासारखे कसोटी प्लेअर आहेत. त्यामुळे अंतिम फेरीत मुंबईचे पारडे जड आहे.

**रणजी स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात विदर्भाने मध्य प्रदेशचा पराभव करून अंतिम फेरी गाठली. आता रणजी चषकासाठी अंतिम फेरीत मुंबई विरुद्ध विदर्भ यांच्यात संघर्षपूर्ण लढत होईल. कर्णधार अजिंक्य रहाणेसह मुंबई संघात दिग्गज स्टार खेळाडू असल्याने अंतिम फेरीत मुंबईचे पारडे जड आहे. त्यामुळे १० मार्चला मुंबईत होणाऱ्या फायनलमध्ये कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.**

## इंग्लंडचा संघ जाहीर

**पाचवा कसोटी सामना**

■ धर्मशाला

उद्यापासून भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातील ५वा कसोटी सामना उद्यापासून सुरू होत आहे. मात्र ३ सामन्यांत पराभव होऊनही इंग्लंडने आपल्या संघात मोठे बदल केले नाहीत. केवळ एक बदल केला आहे. ओली रॉबिन्सन याच्याऐवजी पुन्हा मार्क वूडचा संघात समावेश केला आहे. धरमशाला कसोटीसाठी इंग्लंडने एक दिवस अगोदरच आपल्या अकरा खेळाडूंची घोषणा केली आहे. आणि संघात बदल केला आहे. चौथ्या कसोटी सामन्यात खेळलेला ओली रॉबिन्सन शेवटच्या कसोटी सामन्यातून बाहेर गेला होता. त्याच्या जागी पुन्हा एकदा मार्क वुडचा प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश केला आहे. झाक क्रावली, बेन डकेट, ऑली पोप, जो रूट, जॉनी बेअरस्टो, बेन स्टोक्स (कर्णधार), बेन फोक्स (यष्टीरक्षक), टॉम हार्टली, मार्क वूड, जेम्स अँडरसन आणि शोएब बशीर

## महिला क्रिकेटच्या इतिहासात शबनमचा सर्वात वेगवान चेंडू टाकण्याचा विक्रम

■ नवी दिल्ली



सध्या भारतात महिला प्रीमियर लीग सुरू आहे. या स्पर्धेत जगभरातील नामांकित महिला खेळाडू खेळत आहेत. यातील दक्षिण आफ्रिकेची स्टार गोलंदाज शबनम हिने एक वेगळाच विक्रम केला आहे. तिने दिल्ली विरुद्ध मुंबई इंडियन्स या सामन्यात मुंबई इंडियन्सकडून गोलंदाजी करताना ताशी १३२ किमी वेगाने चेंडू टाकला आहे. फक्त पुरुष क्रिकेटमधील काही मोजकेच गोलंदाज इतक्या तुफान वेगात चेंडू टाकतात. यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार कमिन्स, स्टार्क, न्यूझीलंडचा बोल्ट विंडीजचा जोसेफ, पाकिस्तानचा शाईन आफ्रिदी यासारख्या खेळाडूंचा समावेश आहे. मात्र महिला क्रिकेटमध्ये इतक्या वेगाने आजवर कुणीही गोलंदाजी केली नव्हती. पण शबनमने वयाच्या ३५ व्या वर्षी हा विक्रम केला.

## केएमपी युवा कबड्डी स्पर्धेत रत्नागिरी जिल्हा संघ विजयी

■ पुणे

केएमपी युवा कबड्डी सीरिज २०२४ मध्ये आज दुसऱ्या दिवसाची सुरुवात रत्नागिरी जिल्हा विरुद्ध धुळे जिल्हा या लढतीने झाली. धुळे संघाने ३-० अशी सुरुवात केली होती. मात्र रत्नागिरीच्या अमरसिंग कश्यप व अभिषेक शिंदे यांनी पलटवार करत धुळे संघावर लोन पडला. मध्यंतरापर्यंत धुळेच्या अक्षय पाटीलने सलग चढायांमध्ये गुण मिळवत सामन्यात रंगत आणली. रत्नागिरी जिल्ह्याकडे मध्यंतराला २०-१८ अशी आघाडी होती.

दुसऱ्या हाफच्या सुरुवातीलाच अभिषेक शिंदेने गुण मिळवत धुळे संघाला दुसऱ्यांदा ऑल आऊट केले. अभिषेक शिंदेला श्रेयस शिंदेने चांगली साथ दिली. धुळे संघाकडून अक्षय पाटीलने सलग दुसरा सुपर टेन पूर्ण केला.

## घोष चषक महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेत डॅशिंग स्पोर्ट्स अंतिम फेरीत

■ मुंबई

स्पोर्टिंग युनियनने कल्याणदास मेमोरियल स्पोर्ट्स फाऊंडेशन आणि युरोपेमसह आयोजित केलेल्या अजित घोष महिला टी-२० स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यामध्ये नॅशनल क्रिकेट क्लबचा ८ विकेट्सनी पराभव करून डॅशिंग स्पोर्ट्सने या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. नॅशनलला २० षटकांत केवळ ९ बाद ८६ अशी मजल मारता आली. त्यांची ध्रुवी त्रिवेदी ही १८ धावांची सर्वोच्च खेळी करू शकली. निलाक्षी तलाठी आणि श्रेया सुरेश यांची गोलंदाजी प्रभावी ठरली. डॅशिंगने १५ षटकांमध्ये आपले लक्ष्य पार केले. २ बाद १८ नंतर खुशी निजाई (नाबाद २७) आणि किमया राणेने (नाबाद ३२) ६९ धावांची अभेद्य भागिदारी केली.

**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

**पूर्वी मेटल्स प्रा. लि.च्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | मे. पूर्वी मेटल्स प्रा. लि. |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | १८ ऑक्टोबर, २०११ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U51109MH2011PTC223185 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | प्लॉट क्र. ९५/९६/१२९ जवाहर को-ऑप. इंड. इस्टेट, कामोठे पनवेल, जिल्हा रायगड, मुंबई महा. ४१०२१९ भारत. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | २३.०२.२०२४ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | ०४.०३.२०२४ |
| ८ | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | भारती मनोज डागा IBBI/IPA-001/IP-P-01963/2020-21/13070 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | ९४बी, पलश टॉवर, वीरा देसाई रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३, कन्ट्री क्लबजवळ, मुंबई उपनगर, महाराष्ट्र, ४०००५३. bharteedaga1008@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | ३०१, पूनम पर्ल्स, न्यू इंडिया ॲश्यूरन्स कॉलनीसमोर, जुहू लेन, अंधेरी (प) - ४०००५८. liquidation.purvimetals@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | २४.०३.२०२४ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी **दि. २३.०२.२०२४** रोजी **पूर्वी मेटल्स प्रा. लि.**चे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
**पूर्वी मेटल्स प्रा. लि.**च्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. २४.०३.२०२४** रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
**भारती मनोज डागा**
**पूर्वी मेटल्स प्रा. लि.चे परिसमापक**

दिनांकः ०६.०३.२०२४
ठिकाणः मुंबई

**फॉर्म जी**
**नवी मुंबई येथे अभियांत्रिकी, प्रापण आणि बांधकाम (ईपीसी) मध्ये कार्यरत**
**फर्नेस फॅब्रिका (इंडिया) लिमिटेड**
**करिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन आणि सीआयएन / एलएलपी क्र. | फर्नेस फॅब्रिका (इंडिया) लिमिटेड पॅनः AAACF0527E सीआयएनः U28123KL1985PLC026752 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | एमआयएलएमए डेअरीसमोर, कूनमथाई, इडापल्ली, कोची, केरळ - ६८२०२४. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | https://furnacefabricaindia.com/ |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | १) सी-१५, एमआयडीसी, टीटीसी इंड. एरिया, गाव पावणे, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१०. २) सी-१६, एमआयडीसी, टीटीसी इंड. एरिया, गाव पावणे, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०५. ३) कार्यालय क्र. ७१४ स्वस्तिक चेंबर्स ओनर्स सीएचएस लि., सीएसटी रोड, चेंबूर, मुंबई - ४०००७१. ४) नोंदणीकृत कार्यालयः कूनमथाई, एमआयएलएमए डेअरीजवळ, ईडापल्ली, कोची-६८२०२४. ५) प्लॉट क्र. ३८ आणि ३९, वाशी गाव, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. ६) टीपीएस स्कीम क्र. १ अंतर्गत प्लॉट क्र. ३७८, एसटी बस डेपोजवळ, पनवेल गाव - ४१०२०६. ७) कांदला (सेझ), प्लॉट क्र.५१८-५२१-३७०२०१ येथील वर्कशॉप (विवादाअंतर्गत) |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | ही ईपीसी कंपनी असल्याने स्थापित क्षमतेची गणना करता येत नाही. |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/ सेवांचे परिमाण आणि मूल्य | वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्रानुसार उलाढाल रु. २३५.९६ कोटी एवढी होती. तथापि, गत २ वर्षांकरिता व्यवसाय अ-कार्यरत आहे. तसेच, ही ईपीसी कंपनी असल्याने उत्पादने/सेवांच्या संख्येची गणना करता येत नाही. |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | चार (४) कर्मचारी |
| ८. | शेवटच्या दोन वर्षांचे उपलब्ध वित्तीय विवरणपत्र (वेळापत्रकासह), धनकोंची यादी समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असलेले यूआरएलः | वेबसाईट यूआरएल https://furnacefabricaindia.com/ किंवा माहिती furnace.ibc@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करता येऊ शकतील. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असलेले यूआरएलः | पात्रता निकष https://furnacefabricaindia.com/ वर उपलब्ध असलेल्या तपशीलवार स्वारस्य अभिव्यक्ती प्रक्रिया दस्तऐवजामध्ये उल्लेखित आहेत किंवा furnace.ibc@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करता येतील. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | २२ मार्च, २०२४ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | १ एप्रिल, २०२४ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | ६ एप्रिल, २०२४ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | १६ एप्रिल, २०२४ |
| १४. | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मूल्यांकन नमुना आणि ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | २० एप्रिल, २०२४ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | २० मे, २०२४ |
| १६. | ईओआय सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | furnace.ibc@gmail.com |

टीपः सध्या सीआयआरपी कालावधी दि. २९ एप्रिल, २०२४ पर्यंत आहे. म्हणून, ठराव व्यावसायिक धनको समितीच्या मंजुरीनंतर निर्णय अधिकाऱ्यांकडे सीआयआरपी कालावधी वाढविण्याकरिता अर्ज दाखल करणार आहेत. परिणामी, उपरोल्लेखित वेळापत्रक धनको समितीच्या आणि त्यानंतर निर्णय अधिकाऱ्यांच्या मंजुरीच्या अधीन आहे.

**अलोक कुमार अगरवाल ठराव व्यावसायिक**
**फर्नेस फॅब्रिका (इंडिया) लिमिटेड**
आयबीबीआय नोंद. क्र. IBBI/IPA-001/IP-P00059/2017-2018/10137
**आयबीबीआय नोंदणी पत्ता:** ६०५, सनसिटी बिझनेस टॉवर, गोल्फ कोर्स रोड, सेक्टर ५४, गुरगाव, हरयाणा-१२२००२.
एएफए वैधताः १९ नोव्हेंबर, २०२४

**दिनांक: ०७ मार्च, २०२४**
**ठिकाण: नोएडा**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
मुख्य अभियंता (यांत्रिक आणि विद्युत) यांचा विभाग
क्र.इ.इ. मेक./४७५०/रेफ्री दि. ०५.०३.२०२४
**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | मु. अभि. (यांत्रि. व विद्यु.) |
| उप-विभाग | उ.मु.अभि. (यांत्रि. व विद्यु.) शहर / कार्य. अभि. यांत्रि (रेफ्रिजरेशन) |
| बोली क्र. | 1) 2024_MCGM_1026764_1 |
| विषय | हॉकर्स प्लाझा, दादर येथे महापालिका मुख्य लेखापरीक्षीत विभागाच्या कार्यालयाला ए. सी. सुविधा पुरविणे. इ. इ. मेक/रेफ्री./टी-१०० दिनांकित ०५.०३.२०२४ |
| बोली प्रारंभ दिनांक व वेळ | ०७.०३.२०२४ रोजी स. ११.०० वा. |
| बोली-पूर्व सभा | १४.०३.२०२४ रोजी दु. १५.०० वा. |
| बोली समाप्ती दिनांक व वेळ | २७.०३.२०२४ रोजी दु. १६.०० वा. |
| संकेतस्थळ | http://portal.www.mcgm.gov.in |
| संपर्क अधिकाऱ्याचे नाव | श्री. ए. के. जांभोरे |
| दूरध्वनी क्र. | -- |
| मोबाईल क्र. | ९९३०१२८३८७ |
| ई-मेल | eemechref.me@mcgm.gov.in |

**सही/-**
**कार्य. अभि. यांत्रिकी (रेफ्रीजरेशन)**

पीआरओ/३२२७/जाहि./२०२३-२४

**शक्यतो घरी केलेले व ताजे अन्न पदार्थ खावे.**

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**आपल्यासमोर केलेले कौतुक ही आपली स्तुती असते तर, आपल्या माघारी केलेले कौतुक हे आपले कर्तृत्व असते.**

## पंचांग

**गुरुवार ७ मार्च २०२४**
**शक १९४५ शोभननामसंवत्सर**



**माघ कृष्ण द्वादशी**
**नक्षत्र : उत्तराषाढा**

**रवी उदय- ०६-५५**
**रवी अस्त- १८-४५**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मकर**

**विजया भागवत एकादशी, श्रवणोपवास**

## कविता...

### मोबाईलच्या दुनियामध्ये तरुणाई हरवली...

मोबाईलच्या दुनियेमध्ये तरुणाई हरवली
अभ्यासाकडे बघता बघता पाठ फिरवली
संस्कार संस्कृतीला आज तरुणाई विसरली
एक एक पायरी चढताना आपसुक घसरली
मोबाईलच्या दुनियामध्ये तरुणाई हरवली

दिवस-रात्र मोबाईलपाई तहान भूक हरवली
मोबाईलच्या नादामध्ये नातीगोती विसरली
वेड्यासारखे मोबाईलवरती प्रेम करू लागली
खतरनाक गेमच्या खेळात उगा घसरु लागली
मोबाईलच्या दुनियामध्ये तरुणाई हरवली

चालता चालता एकमेका ठोकर देवू लागली
दिसताना कसं न दिसल्यासारखं करू लागली
चूक असताही अपशब्दात वाद घालू लागली
मोबाईलच्या व्यसनापायी वेडी झाली तरुणाई
मोबाईलच्या दुनियामध्ये तरुणाई हरवली

किती सांगावं तरुणाईस सांगून ऐकत नाही
अनमोल जीवाची त्यांना पर्वाच राहिली नाही
आईबापाचा आधार आपण हेच कळत नाही
जन्मदात्या आई-वडिलांना समजून घेत नाही
किती सांगावं तरुणाईस सांगून ऐकत नाही

मोबाईलच्या वेडापायी तरुणाई झाली बेभान
अपघातालाही कारण असे त्यांचे चंचल मन
समजना तरुणाई यातून कधी होईल सावधान
का वेडी झाली ही तरुणाई इतकी विनाकारण
समजना तरुणाई यातून कधी होईल सावधान

कधी होईल सावधान.....
कधी होईल सावधान.....

**दत्तात्रय शिवराम धनावडे**
कोळसेवाडी कल्याण, भ्रमणध्वनी-९८२१३४५१०१

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**